मु. अ/औ.मं/मं.बै/ 122 /९६
मुख्याधिकारी यांचे कार्यालय,
औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
औरंगाबाद. दिनांक: 9/2/96

प्रति,

कार्यकारी अभियंता, औरंगाबाद मंडळ.
मिळकत व्यवस्थापक औरंगाबाद मंडळ.
मुख्य लेखा अधिकारी औरंगाबाद मंडळ.
उपअभियंता चित्रशाखा औरंगाबाद मंडळ.
भूसंपादन शाखा औरंगाबाद मंडळ.
कनिष्ठ सहाय्यक वास्तुशं./विधी सहाय्यक औरंगाबाद मंडळ

विषय:-दिनांक २९.१.९६ रोजी झालेल्या मंडळाच्या १०० व्या बैठकीच्या कार्यवृत्तांवर कार्यवाही करणेबाबत.

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची दिनांक २९.१.९६ रोजी झालेल्या मंडळाच्या १०० व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयावर कार्यवाही करण्यासाठी सदर बैठकीचा कार्यवृत्तांत आपणाकडे पाठविण्यांत येत आहे. त्यासंबंधीची योग्य ती कार्यवाही त्वरीत करावी.

मुख्याधिकारी,
औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
औरंगाबाद.

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची दि. २९. १. १९९६ रोजी झालेल्या
झालेल्या १०० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

बैठकीस खालिल पदाधिकारी उपस्थित होते.

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

| | |
|---|---|
| १] श्री. किशनचंदजी तनवाणी | सभापती, औरंगाबाद मंडळ. |
| २] श्री. दे. हि. मुन, उपसंचालक, नगररचना औरंगाबाद विभाग, औरंगाबाद. | सदस्य |
| ३] श्री. भास्कर मुंढे, मुख्य अधिकारी, औमं. | सदस्य |
| ४] श्री. मतीन कादरी उपअभियंता [स्लम] आयुक्त औरंगाबाद मनपा, औरंगाबाद | यांचे सदस्य प्रतिनिधी |
| ५] श्री. पुंडलीक माधवराव शिंदे | सदस्य |
| ६] श्री. नारायणराव जाधव | सदस्य |
| ७] श्रीमती कमल जवाहर तुल्ले | सदस्या |
| ८] श्रीमती उषा माने | सदस्या |
| ९] श्री. सुरेंद्र कुलकर्णी | सदस्य |
| १०] श्री. गणेश मोहोरे | सदस्य |
| ११] श्री. मुकेश जयस्वाल | सदस्य |
| १२] श्री. औसारामजी तळेकर | सदस्य |
| १३] श्री. अशोक लोंबटे | सदस्य |
| १४] श्री. अनिल पोलकर | सदस्य |
| १५] श्री. सुरेश जैन | सदस्य |
| १६] श्री. सुजित ठाकुर | सदस्य |
| १७] प्रा. नंदुकुलकर्णी | सदस्य. |

सामुहिक वंदेमातरम नंतर बैठकीस सुरुवात करण्यांत आली.

विषय क्रं. १. दि. १०. १. १९९६ रोजी झालेल्या मंडळाच्या ९९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत [कायम] करणे बाबत.

— x —

दिनांक १०. १. १९९६ च्या ९९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला कि,

ठराव क्रं. ६१०

मंडळाच्या दिनांक १०. १. १९९६ च्या ९९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतवर चर्चा होऊन मंडळाच्या ९९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

..२

विषय क्र. २५: सन १९९५-९६ या आर्थिक वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक व सन १९९६.९७ या वर्षाचे प्रस्तावीत अंदाजपत्रक मंजूर करणेबाबत.

....

सदर विषयाची बाब टिप्पणी मुख्य लेखा अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास वाचुन दाखविली.

या अनुषगाने श्री. सुजीत ठाकुर यांनी विचारले की, अंदाजपत्रक कोणत्या तारखेपर्यन्त मंडळाने मंजूर करावे असे काही आहे का ?

या अनुषंगाने खुलासा करण्यांत आला की, मंडळाचा अर्थसंकल्प मंजूर करण्यासाठी अशी तारीख निश्चित नाही. परंतु प्राधिकरणाचा अर्थसंकल्प हा २८ फेब्रुवारी पर्यन्त मंजूर करु शासनास पाठविणे आवश्यक आहे. त्याकरिता मंडळाने फेब्रुवारीच्या सुरुवातीच्या आठवड्यात अर्थसंकल्प मंजूर करुन प्राधिकरणाकडे पाठविणे आवश्यक आहे.

मंडळाचे सदस्य श्री. सुरेश जैन यांनी विचारले की, झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत डिसेंबर ९५ अखेरपर्यन्त २०.२७ लक्ष खर्च करण्यांत आले आहे व ७०.०० लक्षाची तरतुद आहे. तेंव्हा या दोन महिन्यात बाकीची ही तरतुद खर्च होईल का ?

यावर खुलासा करण्यांत आला की, म.न.पा./नगरपालिकेकडे कामे प्रगतीपथावर आहेत व उर्वरीत तरतुद मार्च ९६ अखेरपर्यन्त खर्च होईल.

अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर चर्चा करतांना मुख्याधिकारी यांनी प्रतिपादन केले की, मंडळाने ९६.९७ मध्ये ज्या गृहनिर्माण योजना प्रस्तावित केल्या आहेत त्या योजनेसाठी जमिन उपलब्ध आहे. नियोजन व आराखडे तयार करण्यासाठी काहीही अडचण नाही व सर्व बाबी पूर्ण करुन प्रशासकिय मान्यता मिळेल हे गृहित धरुन अर्थसंकल्पात आर्थिक व भौतिक उद्दिष्टाकरिता समावेश करण्यांत आलेला आहे.

चर्चेच्या ओघात प्रा. अशोक लोबटे यांनी मुद्दा उपस्थित केला कि, अंदाजपत्रामध्ये ज्या योजना अंतर्भुत आहेत त्या मंडळाकडे जमिन उपलब्ध असल्यामुळे करण्यांत आल्या आहेत का?. व नविन योजना प्रस्तावित करावयाची असल्यास त्यासाठी या अर्थसंकल्पात तरतुद करणे आवश्यक आहे का?.

प्रा. लोबटे यांनी सांगितले कि, अंबेजोगाई येथिल मेडिकल कॉलेजच्या कर्मचाऱ्यांनी घरांसाठी मागणी केली आहे व त्यासाठी एक यादी दिली आहे. तसेच मागच्या बैठकीत न.प. अंबेजोगाईने विकसीत केलेल्या भुखंडाबाबत चर्चा झाली होती. त्या अनुषंगाने काय कार्यवाही करण्यांत आली असे त्यांनी विचारले.

यावर खुलासा करण्यात आला कि, मंडळाकडे जमिन उपलब्ध आहे व मागणी येईल असे गृहित धरुन योजनेचा अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकात समावेश केला आहे व नविन योजना कार्यान्वीत करावयाची असल्यास योग्य जमिन व लोकांची मागणी असल्यास उपाध्यक्ष/वित्त नियंत्रक प्राधिकरण यांची मंजुरी घेऊन अर्थसंकल्पात तरतुद करता येईल अथवा आठमाही सुधारित अंदाजपत्रकात तरतुद करुन योजना राबविता येईल.

मुख्याधिकारी यांनी प्रतिपादन केले कि, अंबेजोगाई येथिल शासकिय जमिनीची मागणी जिल्हाधिकारी बीड यांचेकडे करण्यात आली आहे. परंतु अद्यापर्यंत जमिन मिळालेली नाही.

अंबेजोगाई येथिल न.प. ने आय.यु.डी.पी. योजनेअंतर्गत विकसीत केलेल्या शिल्लक भुखंडाच्या पाहणीसाठी उपअभियंतास पाठवुन अहवाल मागवुन पुढिल कार्यवाही करु असे मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

मंडळाच्या सदस्या श्रीमती उषा साने, यांनी हिंगोली, गंगाखेड सेलु येथिल गृहनिर्माण योजनांचा प्रस्तावित अंदाजपत्रकात समावेश नसल्याचा उल्लेख केला.

या अनुषंगाने खुलासा करण्यात आला कि, हिंगोली, गंगाखेड, सेलु येथिल जमिन मंडळाच्या ताब्यात नाही त्यामुळे ९६.९७ च्या प्रस्तावित अर्थसंकल्पात तेथिल योजनांचा समावेश नाही. जर जमिन उपलब्ध झाल्यास व लोकांची मागणी असल्यास योजना सुधारित अंदाजपत्रकात घेता येईल.

प्रा. नंदु कुलकर्णी व श्रीमती साने यांनी सुचना केली कि, जिल्ह्याच्या ठिकाणी कार्यालय उघडण्यात यावे.

या अनुषंगाने खुलासा करण्यात आला कि, कार्यालय उघडण्यासाठी वर्कलोड असणे आवश्यक आहे. योजनेस सुरुवात झाल्यास कार्यालय उघडणे हे मंडळाच्या अखत्यारितील बाब आहे.

सन १९९६-९७ च्या प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर चर्चा करतांना मंडळाचे सदस्य प्रा. नंदु कुलकर्णी यांनी प्रतिपादन केले कि, जिल्हानिहाय व योजनानिहाय चर्चा करावी.

त्यानुसार मंडळाचे सदस्य श्री. आसाराम तळेकर यांनी प्रतिपादन केले कि, तिसगांव येथिल योजना कार्यान्वीत करण्यासाठी ज्या अडचणी आहेत त्या अनुषंगाने मंडळाच्या ११ व्या बैठकीत चर्चा करण्यात आली होती त्यानुसार काही कार्यवाही करण्यात आली का?

या अनुषंगाने खुलासा करण्यात आला कि, तीसगांव येथे प्रस्तावित असलेल्या योजनेस लोकांची चांगली मागणी आहे. परंतु पाणीपुरवठ्या अभावी व स्टोन क्रशर्सच्या अडचणीमुळे तेथे योजना कार्यान्वीत करता आलेली नाही.

वाळुज विभागात सिडको हे [illegible] विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन कार्यरत आहे व योजनेचे आराखडे मंजुर करुन घेण्यासाठी म्हाडाने पैसे भरले आहेत व परंतु पाणीपुरवठा सिडकोकडुन लवकर उपलब्ध होण्याची शक्यता नाही. यासाठी

[signature]

वेळोवेळी सिडकोकडे पाठपुरावा केला. सिडकोकडून डिसेंबर९७ पर्यंत पाणी मिळेल अशी अपेक्षा आहे.

मुख्याधिकारी यांनी सांगितले कि, मंडळाने तिसगांव येथिल जमिनीवर २४ उ.उ.गट गाळे बांधले आहे. त्यासाठी पाणीपुरवठ्याची व्यवस्था खाजगी विहीरीवरुन करण्यांत येऊन गाळेवाटप सुरु आहे.

मंडळाच्या सदस्यांनी सुचना केली कि, एम.आय.डि.सी. कडुन पाणी घ्यावे. यावर खुलासा करण्यांत आला कि, एमआयडिसी चा दर हा औदयोगिक रेट असल्याने लाभधारकांना परवडणार नाही.

चर्चेच्या ओघात तिसगांव येथिल मंडळाच्या जमिनीलगत स्टोन क्रशर्स आहेत व त्या स्टोन क्रशर्सच्या धुळीमुळे सदर योजना कार्यान्वीत करण्यास अडचण आहे. यासाठी जिल्हाधिकारी यांचेकडे वेळोवेळी पाठपुरावा केला आहे. परंतु अदयाप स्टोन क्रशर्स उठविण्यात आलेले नाही. सदर स्टोन क्रशर्सधारकांचे लिजपिरियड संपलेला आहे व चालु असलेले स्टोन क्रशर्स हे मंडळाच्या जागेवर नसल्यामुळे त्यांचे विरुध्द मंडळास काहीही कार्यवाही करता येत नाही.

या अनुषंगाने श्री. आसाराम तळेकर सदस्य यांनी प्रतिपादन केले कि, स्टोन क्रशर्सधारकांना दुसरीकडे जमिन, वीज. इत्यादी उपलब्ध करुन दिलेले आहे. तेंव्हा जिल्हाधिकारी/औरंगाबाद यांच्याकडे मंडळाच्या भावना कळवुन सर्व्हे क्रं. १०४/१ या जमिनीलगत असलेले अनधिकृत स्टोन क्रशर्समुळे मंडळाच्या गृहनिर्माण योजनेचा प्रकल्प कार्यान्वीत करण्यासाठी मंडळास अडचण निर्माण होत असल्याचे निदर्शनास आणुन स्टोन क्रशर्सहलविण्याची कार्यवाही करण्यासाठी मंडळातर्फे विनंती करावी.

या विषयी मा. सभापती यांनी सांगितले कि, तिसगांव येथिल स्टोन क्रशर्स उठविण्यासाठी जिल्हाधिकारी यांना पत्र पाठविलेले आहे. या अनुषंगाने मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले कि, मंडळाच्या भावना जिल्हाधिकारी यांना कळवून अनाधिकृत स्टोन क्रशर्स उठविण्याची कार्यवाही करण्याची विनंती करावी.

तसेच मुकूंदवाडी येथल गृहनिर्माण योजना कार्यान्वीत करण्यासाठी असलेल्या अडचणी सोडविण्यासाठी सिडकोचे एम.डी. व गृहनिर्माण मंत्री, म्हाडाचे अधिकारी यांची संयुक्त बैठक घेण्यांत यावी असे मंडळाचे सदस्य श्री. आसाराम तळेकर यांनी प्रतिपादन केले.

यावर मा. श्री. केशवचंदजी तनवाणी सभापती यांनी प्रतिपादन केले कि, मा.गृहनिर्माणमंत्री महोदयांनी सिडकोच्या व म्हाडाच्या अधिकाऱ्यांची या विषयावर बैठक घेतली होती व त्यानुसार लवकरच मार्ग निघण्याची शक्यता आहे. त्यामुळे योजना कार्यान्वीतकरणेसुकर होईल.

मंडळाच्या सदस्यांनी मुकूंदवाडी येथिल योजनेसाठी पाणी उपलब्ध आहे का? [illegible] मुकुंद वाडी येथे बांधलेल्या उ.उ.गट गाळे वाटप झालेत का? असे विचारले.

Shrichand

मुख्याधिकारी यांनी सांगितले कि, मुकुंदवाडी येथे मनपातर्फे पाणी-पुरवठयाची व्यवस्था करण्यांत आली आहे व बांधलेल्या ८३ उ.उ.गट गाळ्यापैकी थोडेच गाळे शिल्लक आहेत.

मंडळाचे सदस्य सर्वश्री. प्रा. नंदु कुलकर्णी, अनिल पोलकर, पुंडलिक शिंदे गणेश मोहोरे व इतरांनी मंडळाच्या विविध वसाहतीतील अतिक्रमणाबाबत मुद्दा उपस्थित केला व प्रतिपादन केले कि, मंडळाच्या मोकळ्या जागेवर व योजनेतिल आराखडयामधील भविष्य कालीन विकासासाठी सोडलेल्या भुखंडावर बाहेरच्या लोकांनी अतिक्रमण केले आहे सदर अतिक्रमणे काढण्यासाठी योग्य ती कार्यवाही मंडळातर्फे करण्यांत यावी असे सदस्यांनी सांगितले.

याब विषयावर चर्चा करतांना मा. श्री. किशनचंदजी तनवाणी सभापती यांनी सांगितले कि, मंडळाच्या वसाहतीतील अतिक्रमण काढण्यासाठी मंडळाकडे " अतिक्रमण हटाव " पथक नाही. अतिक्रमण काढण्यासाठी अतिक्रमण हटाव पथक तयार करुन बाहेरच्या लोकांनी केलेले अतिक्रमण काढुन टाकण्यासाठी कार्यवाही करण्यांत येईल. यानंतर मा. श्री. तनवाणी सभापती यांनी सुचित केले कि, वसाहतीतील गाळेधारकांनी त्यांच्या गाळ्यालगत असलेल्या ज्या मंडळाच्या जागेवर अतिक्रमण करुन बांधकाम केलेले आहे व त्या जागेचा इतर वापरही होऊ शकत नाही अशा गाळेधारकांना त्यांच्या लगतच्या जागेची किंमत मंडळाच्या नियमानुसार घेऊन सदर जागा संबंधित गाळेधारकांना देण्याबाबत विचार व्हावा. यावर मंडळाने चर्चा केली व ज्या जागेचा इतर कारणासाठी उपयोग करता येणार नाही व त्यावर नजिकच्या गाळेधारकाने अतिक्रमण केले आहे अशा गाळेधारकांना बाजारभावाप्रमाणे पैसे घेऊन अतिक्रमण नियमित करुन दयावे. त्यामुळे मंडळाला पैसे मिळतिल असे सर्वानुमते ठरले.

श्री. आसारामजी तळेकर, सदस्य औरंगाबाद मंडळ यांनी अविष्कार कॉलनी सिडको औरंगाबाद येथिल ड्रेनेजलाईनच्या बाबत असलेल्या लोकांच्या तक्रारीबाबत विचारणा केली.

यावर खुलासा करण्यांत आला कि, अविष्कार कॉलनी, अरुणोदय व एन-६, सिडको या भागातिल वसाहतीतील ड्रेनेजच्या समस्याचे निवारण करण्यासाठी मंडळाने शासनाकडुन आय. आय. सी [I-I-C] योजनेमधुन रु. ४४.०० लक्ष अनुदान प्राप्त करुन घेतले होते.

सदर सुविधा ड्रेनेज, पाणी, रस्ते मनपाकडे हस्तांतरीत करावयाचे असल्याने मनपाच्या मानकाप्रमाणे काम करुन घेण्यासाठी सदर वसाहतीतील ड्रेनेजचे व पाणीपुरवठा काम मनपाने केलेले आहे व मंडळाने त्यांचेकडे पैसे दिले आहे व काम झाल्यानंतर ड्रेनेज, पाणीपुरवठा मनपाकडे हस्तांतरीत करण्यांत आलेले आहेत.

..७.

कौठा नांदेड येथिल गाळ्यांचीच योजना कार्यान्वीत करावी असे प्रा. नंदुकुलकर्णी यांनी सांगितले.

मुख्याधिकारी यांनी सांगितले कि, मागिल बैठकीत चर्चा झाल्याप्रमाणे गाळ्यांच्या किंमतीच्या १०% अनामत रक्कम घेऊन अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यानंतर प्राधिकरणाचे आदेशानुसार २५% अनामत रक्कम भरुनही काही अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे कौठा नांदेड येथे घरे बांधण्याची योजना कार्यान्वीत करण्यासाठी प्रस्ताव पाठवुन प्राधिकरणास कळविण्यात येईल.

प्रा. नंदुकुलकर्णी सदस्य औ.मं. यांनी विचारले कि, मुखेड जि. नांदेड येथिल योजनेचे काय झाले.

यावर खुलासा करण्यांत आला कि, मुखेड येथे गाळे बांधण्यासाठी निविदा मागविण्यांत आल्या होत्या. परंतु निविदा ३०% टक्के जास्त आल्याने निविदा-धारकाशी वाटाघाटी करुन निविदेत दिलेले दर कमी करण्याचे सांगितले निविदा-धारकाने निविदेत दिलेला दर कमी करुन २७.५० पर्यंत केला. परंतु दर कमी केलेली निविदा ही २७.५० टके जादा दराची असल्याने ती निविदा मंजुर करण्याचे अधिकार मंडळास नसल्याने सदर निविदा प्राधिकरणाच्या मंजुरीसाठी पाठविण्यांत आली होती. परंतु प्राधिकरणाने मुखेड येथिल कामासाठी प्राप्त झालेली निविदा रद्द करुन गाळ्याऐवजी भुखंडाची योजना कार्यान्वीत करावे असे कळविले आहे.

या अनुषंगाने प्रा. ~~मुद~~ नंदु कुलकर्णी यांनी सांगितले कि, परत निविदा मागवुन गाळ्याची योजना राबवावी.

या अनुषंगाने मा. श्री. किशनचंदजी तनवाणी सभापती यांनी विचारले कि, भुखंडास प्रतिसाद मिळणार नाही का?

यावर कुलकर्णी यांनी सांगितले कि, गाळ्यांचीच योजना घ्यावी.

मा. श्री. किशनचंदजी तनवाणी सभापती औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले कि, गाळ्याची योजना घ्यावयाची असल्यास प्राधिकरणाच्या नविन धोरणानुसार २५% अनामत रक्कम भरुन अर्ज मागविण्यासाठी जाहिरात द्यावी व संबंधित अर्जदारांना वैयक्तीकरित्या कळवावे.

प्रा. अशोक लोमटे यांनी गेवराई येथिल योजनेबाबत विचारणा केली कि, भौतिक उदिद्ष्टांमध्ये गाळ्यांच्या संख्येचा उल्लेख नाही. त्यावर खुलासा करण्यांत आला कि, गेवराई येथे ब-याच वेळा जाहिराती दिल्या परंतु त्यास प्रतिसाद आला नाही. म्हणुन भौतिक उदिद्ष्टांमध्ये गाळ्यांच्या संख्येचा उल्लेख केलेला नाही.

सन ९६-९७ च्या प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातिल भुकंप पुनर्वसन कामाच्या शिर्षकाखालिल एजन्सी चार्जेस बाबत मंडळाचे सदस्य श्री. सुजित ठाकुर यांनी माहिती विचारली.

यावर खुलासा करण्यात आला कि, सास्तुर पेठसावंगी, माकणी हे गांव भुकंपपुनर्वसनासाठी म्हाडाकडे आहेत. म्हाडा फक्त कन्सलटंट म्हणुन काम करित आहे व त्यासाठी कन्सलटंट चार्जेस मिळत आहे.

मुख्य अधिकारी श्री.म. यांनी प्रतिपादन केले कि, सास्तूर येथे म्हाडाच्या नियंत्रणाखालि एक युनिट कार्यरत आहेत. त्याचा आणि मंडळाचा तसा काही एक संबंध नाही फक्त अधिकारी/कर्मचा-यांचे वेतन, देण्यापुरताच मंडळाचा संबंध आहे. भुकंप पुनर्वसनाच्या कामाचे देयके प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिट[P.M.U] हे देतात..

श्री. सुजित ठाकुर यांनी सांगितले कि, उस्मानाबाद व लातूर या दोन जिल्यातिल पुनर्वसन भागातिल आम्ही सदस्य आहोत. जेंव्हा आम्ही त्या भागात फिरतो व पुनर्वसनाच्या अनुषंगाने लोकांच्या काही सुचना/तक्रारी असल्यास त्यासाठी सदस्य या नात्याने आम्ही सुचना केल्यास त्याची प्रकल्प संचालक, भुकंप पुनर्वसन हे दखल घेतिल का?

मुख्य अधिकारी यांनी प्रतिपादन केले कि, भुकंप पुनर्वसन विभागाच्या अनुषंगाने कांही आदेश देणेचा मंडळाला अधिकार नाही, तथापि लोकांच्या कांही सुचना तक्रारी असतिल तर त्या सदस्यांनी प्रकल्प संचालकांना सांगितल्या तर त्याची दखल ते नक्कीच घेतिल. मंडळामार्फत तसे विनंती पत्र त्यांना पाठवण्यात येईल.

यावर चर्चा करतांना असे ठरले कि, मा. सभापतींच्या सहीने प्रकल्प संचालक भुकंप पुनर्वसन सास्तूर यांना पत्र पाठवुन कळविण्यात यावे कि, उस्मानाबाद, लातुर येथिल मंडळाच्या सदस्यांनी भुकंप पुनर्वसनाच्या अनुषंगाने काही सुचना केल्यास त्याचा विचार व्हावा.

सन १९९५-९६ या आर्थिक वर्षाचे सुधारित अंदाजपत्रकावर व १९९६-९७ या वर्षाचे प्रस्तावित अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला कि,

ठराव क्रं. ६११.

"सन १९९५-९६ या आर्थिक वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक व सन १९९६-९७ या वर्षाचे प्रस्तावित अंदाजपत्रकास मंडळाने मान्यता दिली व मंजुरीसाठी प्राधिकरणाकडे पाठवावे असे ठरले."

पटलावरिल विषय संपल्यानंतर मंडळाचे सदस्य श्री. आसारामजी तळेकर यांनी बैठकीचा समारोप केला. समारोप करतांना श्री. तळेकर म्हणाले कि, मागील बैठकीचे वेळी विचारण्यात आलेली बरीच माहिती सादर करण्यात आली आहे. नविन योजना कार्यान्वीत करण्यासाठी मंडळाच्या सदस्यांनी प्रयत्न करावे व वाळूज भागात व शेंद्रा भागात नविन औदयोगिक वसाहती होणार आहे. त्यामुळे लोकांची घराची मागणी वाढणार आहे. त्यासाठी मंडळाने जमिन

घेण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच मंडळाचे कामकाज गतिमान करून लोकांचा म्हाडाने विश्वास संपादन करून लोकांना लवकरात लवकर घरे मंडळ तत्परतेने कसे देऊ शकेल याचे प्रयत्न करावेत.

श्री. तळेकर यांच्या समारोप भाषणानंतर राष्ट्रगीत होऊन मा. अध्यक्षांचे परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले.

[ मा. श्री. किशनचंदजी तनवाणी ]
सभापती/औरंगाबाद मंडळ.